# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - http://mumbai.dte.org.in

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१३/2371
दिनांक :- 17 AUG 2013

कार्यालयीन आदेश

विषय :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अख्यारित नसलेल्या परंतू महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नीत अल्पमुदत अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्यांना मंजूरी देण्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ४/विकामु/तंशि/तांत्रिक-४/२०१०/१८०० दि.०६.०८.२०१०

उपरोक्त विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अख्यारित नसलेल्या परंतू महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नीत अल्पमुदत अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता/प्रवेश याद्यांना मंजूरी देण्यासाठी सहसंचालक,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,मुंबई यांचे वतीने प्राचार्य,शासकिय तंत्रनिकेतने यांना प्राधिकृत करण्यात आलेले होते.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी देखील सदर अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता/प्रवेश याद्यांना मंजूरी देण्यासाठी सहसंचालक,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,मुंबई यांचे वतीने प्राचार्य,शासकिय तंत्रनिकेतने यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

शासकिय तंत्रनिकेतनें ज्या जिल्हयात कार्यरत आहेत, त्या जिल्हयातील संस्थांसाठी संबंधित प्राचार्य हे खाली नमूद केल्यानुसार सहसंचालकांच्या वतीने प्रवेशयाद्यांना मंजूरी देतील.

| अ.क्र. | शासकिय तंत्रनिकेतनाचे नांव व पत्ता | जिल्हयाचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | शासकिय मुद्रण तंत्रसंस्था,मुंबई<br>डॉ.डी.एन.रोड,जे.जे.स्कूल ऑफ आर्किटेक्चरचा परिसर, मुंबई दु.क्र. २२६२१४७४ | बृहन्मुंबई शहर |
| २ | शासकिय तंत्रनिकेतन,मुंबई<br>४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा, मुंबई दु.क्र. २६४७४७८० | मुंबई उपनगर |
| ३ | शासकिय तंत्रनिकेन,ठाणे<br>फडकेपाडा, भारत गिअर्स कं.समोर,मुब्रा,ठाणे, दु. क्र. ३२२५५९०९ | ठाणे |
| ४ | शासकिय तंत्रनिकेतन,पेण<br>मु.पो.रामवाडी, ता. पेण, जि.रायगड, दु.क्र. (०२१४३) २५७०८१ | रायगड |
| ५ | शासकिय तंत्रनिकेतन,रत्नागिरी<br>थिवा पॅलेस जवळ, रत्नागिरी, दु.क्र. (०२३५२)२२२४३५ | रत्नागिरी |
| ६ | शासकिय तंत्रनिकेतन,मालवण<br>मु.पो.कुंभारमाठ, मालवण,जि.सिंधुदुर्ग, दु.क्र.(०२३६५) २५२२२३ | सिंधुदुर्ग |

कृ.मा.प.

गुणवत्ता/प्रवेश याद्या मंजूर करताना प्रवेश यादीसोबत संस्थेनी तपासणीसाठी सादर केलेली खालील कागदपत्रे तपासून, दि. ०६.०८.२०१० च्या संदर्भाधीन आदेशात नमूद केल्यानुसार गुणवत्ता/प्रवेश यादीवर शिक्का उमटवून यादी मंजूर करण्यात यावी. व मंजूर केलेल्या प्रवेशयाद्या नोंदणीसाठी प्राचार्यांकडून परस्पर महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयांना सादर केल्या जाव्यात.

१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने अभ्यासक्रम निहाय निर्धारित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर अनुषांगिक (जसे अनुभव इ.) प्रमाणपत्रे.
२. शाळा सोडल्याचा दाखला. (आवश्यक असल्यास गॅप सर्टिफिकेट) (अर्धवेळ अभ्यासक्रम वगळून)
३. जातीचा दाखला (आवश्यकतेनुसार)
४. एकत्रित गुणवत्ता यादी व अंतिम प्रवेश यादी
५. अभ्यासक्रम सुरु करण्यास/प्रवेश करण्यासाठी शासनाच्या व संचालनालयाच्या मान्यतेचे पत्र
६. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ संलग्न असलेल्याचे पत्र
७. संस्थेंचे माहितीपुस्तक, अर्जाचा नमूना व संस्थेंने प्रवेशासाठी वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या जाहिरातीची प्रत,
८. पात्रता प्रमाणपत्र (इतर व परराज्यातील विद्यार्थ्यांसाठी म.रा.तंशि.मंडळाने निर्गमीत केलेले)
९. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने ठरविलेली फी आकारण्यात आली असल्याबाबतचे संस्थाप्रमुखांचे प्रतिज्ञापत्र
१०. नव्याने मान्यता मिळालेल्या संस्था/अभ्यासक्रमासाठी शिक्षक/यंत्रसामुग्री/ग्रंथालय इ. ची पूर्तता केल्याचे हमीपत्र
११. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली २०११-१२, व २०१२-१३ ची सांख्यिकी माहितीची प्रत
१२. **प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर (दि. १०.०८.२०१३ नंतर) केलेल्या प्रवेशांना किंवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेल्या प्रवेशांना मंजूरी देण्यात येवू नये अशी प्रकरणे दंडात्मक कार्यवाहीसाठी या कार्यालयाकडे सादर करावीत.**

प्रवेश याद्यांना मंजूरी देण्याची कार्यवाही दि. ०१.०९.२०१३ पर्यंत पूर्ण करुन अहवाल मंजूर यादीच्या प्रतीसह या कार्यालयाकडे अभिप्रायार्थ दि. १०.०९.२०१३ पर्यंत एकत्रितपणे सादर करावा.

यादी मंजूरीच्या कार्यवाहीमध्ये अडचणी अथवा शंका असल्यास त्याचे निराकरणासाठी या कार्यालयाकडून वेळच्यावेळी त्याचे निरसन करुन घेण्यात यावे.

(जी.बी.धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रति,
प्राचार्य,
शासकिय तंत्रनिकेतन,मुंबई/ठाणे/पेण/रत्नागिरी/मालवण/
शासकिय मुद्रण तंत्रसंस्था,मुंबई

प्रत माहितीकरिता
१. संचालक, तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई
३. प्रभारी अधिकारी/उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,विभागीय कार्यालय,मुंबई/पुणे